2021-22
BRL
(1)





MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

July To Sept.2021
Issue 39, Vol-11

Date of Publication
01 Sept. 2021

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहुभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Smt. Sindhutai Jadhav [illegible] Mehkar
330



# INDEX

01) Plagiarism Detection Tools
**Dadpe Devidas Eknathrao, Dist.Beed(M.S.)** ||09

02) A Correlation Study between Emotional Intelligence and Academic ...
**Kirti Lokhande & Dr. Chitra Sharma, Bhopal** ||13

03) UTTARAKHAND GLACIER BURST AND AFTERMATH
**Dr. Dinesh Kumar Patidar, Jhabua (MP)** ||18

04) भारतीय समाजव्यवस्थेतील महिलांच्या समस्या
**प्रा.डॉ.संबोधी एम. देशपांडे, चोपडा** ||22

05) पर्यावरणाच्या शाश्वत विकासाबाबत युवकात असलेली जाणीव – एक अभ्यास
**डॉ. बालाजी रंगनाथराव लाहोरकर, जिल्हा बुलडाणा** ||25

06) विसाव्या शतकातील स्वातंत्र्यानंतरचे महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण
**नयना मधुकरराव मेहेसरे, चंद्रपूर** ||27

07) आदिवासी साहित्य : प्रेरणा, स्वरूप, व्याप्ती
**डॉ. गोविंद गायकी, बुलडाणा** ||29

08) उपनिषदों में प्रतिपादित कतिपय नैतिक मूल्य
**डॉ. रेखा अरोड़ा** ||34

09) वाल्मीकि रामायण में सामाजिक शिष्टाचार और आतिथ्यसत्कार की प्रासंगिकता
**मनु कुशवाह, ग्वालियर (म.प्र.)** ||37

10) झारखण्ड के बराकर नदी में जल प्रदूषण एवं उससे निर्मित स्वास्थ्य समस्याएँ
**अनुराधा लकड़ा, रामगढ़ (झारखण्ड)** ||40

11) कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती
**डॉ. राणी बापू लोखंडे, पुणे** ||43

12) मंजुल भगत की कहानियों में बाल–मनोविज्ञान के विविध पक्ष
**डॉ. सुषमा पाल, बरेली** ||45

http://www.printingarea.blogspot.com/03 www.vidyawarta.com/03

**05**

# पर्यावरणाच्या शाश्वत विकासाबाबत युवकात असलेली जाणीव — एक अभ्यास

डॉ. बालाजी रंगनाथराव लाहोरकर
प्राचार्य,
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा

---

**प्रस्तावना :**

पर्यावरण व मानव यांच्यातील नाते अतूट आहे. मानव आपल्या अमर्याद हव्यासापोटी पर्यावरणाच्या सतत विरोधात जात यशाची उत्तुंग शिखरे गाठत आहेय परंतु त्यामुळे निसर्गावर त्या कृत्यांचा फार मोठा विपरीत परिणाम घडल्याचे पावलोपावली उदाहरणे आहेत. परिणामत: पर्यावरण संरक्षणविषयक जाणिव—जागृतीबाबत अत्यंतीक आवश्यकता निर्माण झाली आहे. या सर्वांचा सखोल विचार करूनच भारतीय सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगास पर्यावरण शिक्षण हा विषय विद्यापीठातील सर्व विद्याशाखांमध्ये सक्तीने समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. यानुसार पदवी स्तरावर हा विषय अभ्यासासाठी ठेवण्यात आला आहे.

आजच्या या वैज्ञानिक व तंत्रयुगात सद्य: स्थितीतील आव्हानात्मक पर्यावरणीय परिस्थितीवर नियंत्रण घालून पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये पर्यावरण शिक्षणाची व त्यातील अंतर्भूत असलेल्या अभ्यास पूरक उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे सर्वमान्य होत आहे. समस्यांची जाण होणे व त्या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी त्यांची अभिव्यक्ती होणे हे केवळ पर्यावरण शिक्षणानेच शक्य होत आहे.

**शाश्वत विकास :**

सन १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण व विकासाबाबतच्या वैश्विक आयोगाने आपले समान भविष्य या नावाने एक पर्यावरण विषयक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल ब्रून्टलंड अहवाल म्हणून प्रसिद्ध आहे. या अहवालात चर्चिल्या गेलेल्या शाश्वत विकासाच्या सर्वाधिक मान्यताप्राप्त व्याख्येनुसार— शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढ्यांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय.

शाश्वत विकास म्हणजे मानवाने पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करून आपला विकास करताना भविष्यातील पिढ्यांच्या विकासासाठी उपलब्ध संसाधनांचा नियोजनपूर्वक व काळजीपूर्वक वापर करणे होय. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात प्रचंड वेगाने होत असलेल्या औद्योगिकीकरणामुळे पृथ्वीतलावरील व पृथ्वीच्या अंतरंगातील उपलब्ध नैसर्गिक संसाधने मानवद्वारे मोठ्या प्रमाणात आणि अनियंत्रितपणे वापरली जात आहेत. जे काही शिल्लक आहे ते टिकविता कसे येईल व त्यात भर कशी टाकता येईल यासाठी आपली मानवी ऊर्जा (मनुष्यबळ), वेळ व धन सत्कारणी लागले तरच पुढच्या पिढीला पर्यावरण ऱ्हासाचे चटके बसणार नाहीत.आपल्या येणाऱ्या पिढ्यांचा विचार करून, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन तसेच या संसाधनांच्या साठ्यांची मर्यादा लक्षात घेऊन त्यांचा नियंत्रित वापर शाश्वत विकासात अपेक्षित आहे.

**प्रमुख शब्द :** शाश्वत विकास, ब्रुन्टलंड अहवाल, नैसर्गिक संसाधने, नवीकरणक्षम ऊर्जा स्रोत

**संशोधनाचे उद्दिष्ट :** पर्यावरणाच्या शाश्वत विकासाबाबत युवकात असलेल्या जाणीवेचा शोध घेणे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन हे सन २०२०—२०२१ मध्ये श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जिल्हा बुलडाणा या महाविद्यालयात पदवीच्या द्वितीय वर्षात पर्यावरण अभ्यास विषयाच्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती:**





प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकास पर्यावरणाच्या शाश्वत विकासाबाबत युवकात असलेल्या जाणीवे बाबतची सद्यस्थिती अभ्यासावयाची असल्याने संशोधनाची सर्वेक्षण पद्धती वापरली आहे. तसेच माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा आणि माहिती विश्लेषणासाठी शेकडेवारी या सांख्यिकीय साधनाचा वापर करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधनात श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर जिल्हा बुलडाणा या महाविद्यालयात सन २०२०—२०२१ मध्ये पदवीच्या द्वितीय वर्षात पर्यावरण अभ्यास विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना टेस्ट मोझ द्वारे ऑनलाईन प्रश्नावली पाठवून त्यांचे प्रतिसाद संकलित करण्यात आले आहेत. संकलित माहितीचे विश्लेषण केल्यानंतर पुढील निष्कर्ष प्राप्त झाले आहेत.

**प्रमुख निष्कर्ष :**

सन १९८७ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण व विकासाबाबतच्या वैश्विक आयोगाने आपले समान भविष्य या नावाने एक पर्यावरण विषयक अहवाल प्रसिद्ध केला. जो ब्रुन्टलंड अहवालम्हणून प्रसिद्ध आहे. एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ९३% विद्यार्थी हे जाणतात.

एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ९३% विद्यार्थ्यांचे असे मत आहे कि,मानवाने आजपर्यंत त्यांच्या गरजा भागवण्यासाठी पर्यावरणाचे नुकसान केले आहे.

शाश्वत विकास या शब्दात नैसर्गिक संसाधनासोबतच मानवनिर्मित संसाधनांचा देखील जपून आणि योग्य तितका वापर करणे अपेक्षित आहे असे एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ७०% विद्यार्थ्यांचे मत आहे.

असर्यादित व अनियंत्रित इंधन उपसा, जंगलतोड, अनिर्बंध जलउपसा आणि वापर, प्रदूषण, औद्योगिकीकरण आणि लोकसंख्यावाढीचा प्रचंड वेग यामुळे शाश्वत विकासाला बाधा निर्माण होत आहे याची एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ७९% विद्यार्थ्यांना जाणीव आहे.

शाश्वत विकास म्हणजे मानवाने नैसर्गिक संसाधनांचा उपयोग करून आपला विकास करताना भविष्यातील पिढ्यांच्या विकासासाठी उपलब्ध संसाधनांचा नियोजनपूर्वक व काळजीपूर्वक वापर करणे होय असे एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ८८% विद्यार्थ्यांचे मत आहे.

सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यांसारख्या नवीकरणक्षम ऊर्जा स्रोतांचाजास्तीत जास्त वापर शाश्वत हेच विकासाचे अधिष्ठान आहे असे एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ७९% विद्यार्थ्यांचे मत आहे.

शाश्वत विकास म्हणजे आपल्या वर्तमानातील गरजा पूर्ण करताना आपल्या पुढील पिढ्यांच्या त्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा न येऊ देता साध्य केलेला विकास होय.एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी केवळ ३७% विद्यार्थी हे जाणतात.

तर एकूण प्रतिसादक विद्यार्थ्यांपैकी ५१% विद्यार्थ्यांचे असे मत आहे कि,मानवाच्या जीवनशैली आणि जीवनमानांच्या निरंतर विकासासाठी समाजाचा आर्थिक विकास आणि स्थिर वातावरण दोन्ही आवश्यक आहेत.

**शिफारशी :**

प्रस्तुत संशोधनातून महाविद्यालयीन विद्यार्थी ढासळत्या पर्यावरणीय परिस्थितीची जाणीव असलेला तथा पर्यावरणीय मूल्यांची तात्विक जाण असलेला आढळून आला आहे, तथापि पर्यावरणास घातक ठरणाऱ्या मानवाच्या चुकीच्या दृष्टिकोनाविषयी समाजाच्या प्रत्येक स्तरावर जागृती निर्माण केली पाहिजे. पर्यावरण वाचवण्याची व निसर्ग संवर्धनाची जागरूकता माणसाच्या रोजच्या कृतीमध्ये परावर्तित झालेली दिसणे हेच पर्यावरण रक्षणाच्या दिशेने पडणारे पहिले पाऊल आहे. प्रत्येक नागरीकाने पर्यावरणपूरक जीवन आत्मसात करायला हवे. पर्यावरणविषयक योग्य माहिती मिळवून वैयक्तिक वृत्तीमध्ये बदल केल्याशिवाय पर्यावरणाच्या या ढासळत्या सद्य:स्थितीत सुधारणा होणार नाही. यासाठी विशेषकरून युवकांच्या मनात पर्यावरणाप्रती जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

**समारोप :**

शाश्वत विकासासाठी वर्तमानातील मानवाने अधिक काळजी घेणे अपेक्षित आहे. उपलब्ध नैसर्गिक

साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण तथा काळजीपूर्वक वापर करावा, अनावश्यक नासाडी टाळावी. ऊर्जा साधनांचा योग्य व न्याय्य वापर करावा. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न करावेत. पर्यावरणातील जैवविविधतेच्या संरक्षणाची जबाबदारी उचलावी. भरमसाट वेगाने होणाऱ्या लोकसंख्यावाढीवर नियंत्रण ठेवावे. अपुनर्विकरणीय ऊर्जा साधने ही संपणारी आहेत म्हणून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा यासारख्या पुनर्विकरणीय नैसर्गिक ऊर्जा साधनांचा अधिकाधिक वापर करावा. वृक्षलागवड व वनसंरक्षण करावे. पृथ्वीची पोषणक्षमता टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. वाढत्या शहरीकरणाचे योग्य व्यवस्थापन करावे. ग्रामीण भागाकडून शहरांकडे होणारे लोकांचे स्थलांतरण थांबवावे. याशिवाय ज्या ज्या मानवी वर्तनामुळे पर्यावरणास हानी पोचत आहे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे.

संदर्भ :


- https://www.bbc.com/
- https://vishwakosh.marathi.gov.in/
- https://maharashtratimes.com/
- http://www.nhrc.nic.in/
- http://www.mshrc.gov.in/
- http://shikshanvivek.com/
- http://rajyasabha.nic.in/
- http://mr.vikaspedia.in/
- http://mpcb.gov.in/hazardous/
- https://www.indiacode.nic.in/
- https://envibrary.com/


□□□

**06**

# विसाव्या शतकातील स्वातंत्र्यानंतरचे महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षण

**नयना मधुकरराव मेहेसरे**
पीएच.डी. रिसर्च स्कॉलर,
जनता शिक्षण महाविद्यालय,
उच्च अध्ययन व संशोधन केंद्र, चंद्रपूर
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रस्तावना :-**

मुनष्य जीवनात शिक्षण हेच मानवाचे खरे भुषण आहे. मनुष्य जीवनात शिक्षणात सुरुवात आणि पुढील आयुष्याची मुहूर्तवेळ प्राथमिक शिक्षणानेच रांवली जात.

पाश्चात विचारवंत रुसोने लिहिले आहे. "Plants are Improved by cultivation and man by education"

**प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टये :-**

महाराष्ट्र शासनाने १९६८ मध्ये प्रसिध्द केलेल्या १ ते ७ वी च्या अभ्यासक्रमात प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१. विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण व चौकसपणा करण्याची कुवत निर्माण करणे व जोपासणे.

२. समाजात सुसंस्कृत वर्तन व्हावे म्हणुन विद्यार्थ्यांमध्ये नैतिक व सामाजिक मुल्यांची जोपासना करणे.

३. चांगल्या आरोग्याच्या जिवनासाठी चांगल्या सवयी लावणे.

४. अध्ययनावर लक्ष केंद्रीत करणे.


५. शिक्षण व समाज यांना उपयुक्त अशा एखाद्या हस्तकलेचे संपादन करणे.

६. विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन व श्रम याबद्दलची वृत्ती विकसीत करणे.

७. विद्यार्थ्यांना सामाजिक व सांस्कृतीक कार्यक्रमात सहभागी होण्याची सवय लावणे.

८. शारीरिक कार्यक्षमतेचा विकास करणे.

९. राष्ट्रभावना, नागरी जाणीव, भावणीक एकात्मता तसेच



Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana